महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१
www.dhepune.gov.in E-Mail- dhepune@yahoo.co.in.
फोन नंबर -०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१२४६३९ फॅक्स नंबर ०२०/२६१११११५३

क्रमांक-युएनआय/नेट-सेट/२०१३/विशि-६ दिनांक-१४ मार्च, २०१३

**अत्यंत महत्वाचे/कालमर्यादित १४.०३.२०१३ दु.३.००**

प्रति,

१.सर्व विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण. महाराष्ट्र राज्य.

२.सर्व कुलसचिव
अकृषि विद्यापीठे
महाराष्ट्र राज्य.

**विषय- दिनांक १९.०९.९१ ते ०३.०४.२००० या कालावधीत विद्यापीठात व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयात बिगर नेट/सेट अध्यापकांची झालेली नियुक्त्याबद्दलचा तपशील.**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, दिनांक १९.०९.९१ ते ०३.०४.२००० या कालावधीत विद्यापीठ निवड समितीमार्फत नियुक्त झालेल्या अध्यापकांना नियुक्ती दिनांकापासून सेवा गृहीत धरुन करिअर ॲडव्हान्समेंट योजना लागू करण्याबाबत यापुर्वी विभागीय सहसंचालक व विद्यापीठाकडून महाविद्यालयनिहाय अध्यापकांची संख्या, आर्थिक भार याबाबतचा तपशील वेळोवेळी मागविण्यात आलेला आहे. सदर माहिती प्रत्येक वेळेस बदल झालेला असून निश्चित स्वरुपाची माहिती संचालनालयास प्राप्त झालेली नाही.

प्रस्तुत माहितीवर राज्य शासनास निश्चित स्वरुपाचा निर्णय घ्यावयाचा असल्याने बिनचूक माहिती सादर करणे आवश्यक आहे. यासाठी मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी अचूक माहिती प्राप्तीसाठी निर्देश दिलेले आहेत.

**तरी खालील विवरणपत्रात नमूद केलेली माहिती आज दिनांक १४.०३.२०१३ रोजी ३.०० वाजेपर्यंत निश्चितपणे फॅक्सव्दारे सादर करावी.** तसेच रकाना क्रमांक ३ मधील माहिती विद्यापीठाकडून सहसंचालकांनी प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | दिनांक १९.०९.९१ ते ०३.०४.२००० या कालावधीत विद्यापीठीय व अशासकीय महाविद्यालयातील नियुक्त झालेल्या बिगर नेट/सेट अध्यापकांची संख्या | विद्यापीठ अनुदान आयोगास नेट/सेट मधून सूट देण्यासाठी पाठविलेल्या प्रस्तावांची संख्या | विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या शैक्षणिक अर्हता प्राप्त केलेल्या अध्यापकांची संख्या | | | अर्हता धारक उमेदवारांना नियुक्ती दिनांकापासून सेवा ग्राहय धरुन कॅस चे लाभ दिले तर किती आर्थिक भार पडेल | येणारा वार्षिक आर्थिक भार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | एम.फिल | पीएच.डी | नेट/सेट | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

शिक्षण संचालक(उच्च शिक्षण)
यांचेकरिता.

Accredited By
NAAC (2009)

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX - 2609000 GRAM : UNISHIVAJI
FAX : 0091-0231-2691533 & 0091-0231-2692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (संलग्नता विभाग - २६०९०८९, २६०९१३६)
तार : युनिशिवाजी फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३ व २६९२३३३.
E-mail – affiliationt1@unishivaji.ac.in

जा.क्र. संलग्नता/टे.१/युजीके/ दिनांक :

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक,
संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त शिक्षण संस्था

दि. १४/०३/२०१३ च्या शासन पत्रानुसार महाविद्यालयातील शिक्षकांची माहिती वर नमूद केलेल्या विहित नमून्यामध्ये भरून तात्काळ विद्यापीठात खास दूताकरवी पाठवावी तसेच affiliationt1@unishivaji.ac.in या ई-मेल पत्त्यावर तात्काळ पाठवावी.

आपला विश्वासू,

संचालक,
महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ,